# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५६००७.
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in, Website : www.ropune.org.in

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०१९-२०/२०२०/ ८७० दिनांक : ०७.०२.२०२०.

**महत्वाचे परिपत्रक:**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी सर्व अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीबाबत..
संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. तंशिविकापु/विवि/डीबीटी पोर्टल/२०१९/५१८५ दि. १२.१२.२०१९.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. तंशिविकापु/विवि/डीबीटी पोर्टल/२०१९/५३२३ दि. १९.१२.२०१९.
३) महाडीबीटी पोर्टलवरील दिनांक ०७.०२.२०२० रोजीचा संदेश (Scrolling News)

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक ३ मधील प्राप्त संदेशानुसार सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील,

**१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना,**

**२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना,**

**३. राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना.**

या योजनांसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्विकारण्यासाठी **दिनांक २९.०२.२०२०** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी याबाबत सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, सदरच्या मुदतीमध्ये अद्यापही शिष्यवृत्ती अर्ज न भरलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना, तसेच ज्या पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज काही कारणास्तव रिजेक्ट झालेले असतील अशा विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरून आवश्यक कागदपत्रांसह नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करण्यास सूचित करावे. संस्थांनी त्यांच्या (Clerk/Principal) लॉगीनमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज संस्थास्तरावर व्यवस्थित तपासून संस्थेकडे प्रलंबित न ठेवता तातडीने निकाली काढावेत.

विहीत मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले किंवा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील.

Rijw 7/2/2020

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.